HISTORICITY RESEARCH JOURNAL

# स्वातंत्र्य सेनानी क्रांतीविरांगना लिलाताई पाटील यांच्या कार्यांचा — ऐतिहासीक अभ्यास



**प्रा. डॉ. गोकुळ निंबा पाटील**
गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
नगाव ता.जि.धुळे

## प्रस्तावना-

स्वातंत्र्य सेनानी क्रांतीविरांगना लिलाताई पाटील यांचा जन्म १५ मार्च १९२२ रोजी तळोदे, ता. चाळीसगाव, जि. जळगाव या गांवी झाला. तळोदे हे त्यांचे आजोळ होते. लिलाताईंचे माहेर साकोरे, ता. नांदगाव, जि. नाशिक आहे. सुप्रसिद्ध सहकार नेते, राजकारणातील बडी आसामी. सत्यशोधक समाजाचे नेते वामनाराव गोविंदराव पाटील यांच्या त्या कन्या होत्या. लिलाताईंच्या आईचे नाव धनुबाई असे होते. वामनराव पाटलांचे कुटूंब शेतकरी व सधन असे होते. सुखवस्तू, ऐश्वर्यसंपन्न, कुटूंबातल्या लिलाताई सर्वात जेष्ठ कन्या होत्या. त्यातल्या त्यात त्या दिसायला देखण्या व उजव्या होत्या. स्वत:विषयी लिहितात की, आमच्या व मातुल घराण्यांतील भल्या मोठ्या कुटुंबात सर्व मुलीत मी उजवी होती.

लिलाताईचे बालपण साकोरे या गावीच गेले. अतिशय आनंदात, खेळत, बागडत लीलाताईंचे बालपण गेले होते. त्यांचे प्राथमिक शिक्षणही साकोरे गावच्या प्राथमिक शाळेत झाले असावे. लीलाताईंच्या शिक्षणाबाबत ठोस असे पुरावे उपलब्ध होत नाहीत. केवळ तर्काच्या किंवा तोडक्या संदर्भाच्या आधारावर त्यांचे शालेय शिक्षण झाले असे म्हणता येईल. याचा अर्थ त्या निरक्षर होत्या असे नव्हे. डॉ. हेमंत देशमुख जे लीलाताईंचे व डॉ. उत्तमरावांचे हितचिंतक व चाहत्यांपैकी एक १ मे १९८५ ला लीलाताईंच्या निर्वाणानंतर १५ ऑगस्ट १९८५ ला त्यांनी त्यांच्या स्वतःच्या चालवलेल्या साप्ताहिक लोकमानसच्या क्रांतीविरांगना लीलाताई पाटील स्मृती गौरव विशेषांकाच्या संपादनात 'अर्घ्यदान' नामक संपादकीय लिहिले आहे. त्यात लीलाताईंचा उल्लेख फारसे प्राथमिक शिक्षणही न झालेल्या असा करतात.

डॉ. उत्तमराव पाटील लिखित 'क्रांतीपर्व' ह्या ग्रंथाच्या दिर्घ प्रस्तावनेतही ते लीलाताईचा उल्लेख करतांना 'अल्पशिक्षित ग्रामकन्या' असा करतात. यावरुन त्या अल्पशिक्षित होत्या हे निश्चित.

तत्कालीन शिक्षण व शैक्षणिक परिस्थितीचा विचार केला असता शिकले सवरलेले, शहरी वळणाचे डॉ. उत्तमराव विचारानेही प्रगल्भ झालेले होते. स्त्री शिक्षणाबाबत स्वतःच्या पत्नीनेही शिकावे अशी त्यांची इच्छा होती. डॉ. उत्तमरावांच्या वैद्यकिय चौथ्या वर्षाच्या शिक्षणासाठी जोडीने अहमदनगरला गेले. तेथेच त्यांनी स्वतःच्या शिक्षणासह लीलाताईंच्या शिक्षणालाही प्रारंभ केला. लीलाताईंना शिकवण्यासाठी उत्तमरावांनी नर्सिंग शिक्षणाचा पर्याय निवडला. डॉ. उत्तमराव पाटील व लीलाताई या दोघांचे वैद्यकिय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते अमळनेरला आले. तेथे दवाखाना थाटला पण आता जोडीला साने गुरुजींचे कार्य सुरु झाले होते. खानदेशात स्वातंत्र्य चळवळीचा प्रचार व प्रसार करणारे साने गुरुजी, त्यांचा खरा भार व मावळे होते. ती वानरसेना त्या वानरसेनेत दाखल होते. ते लहान-सहान, उमदे विद्यार्थी डॉ. उत्तमराव पाटील जोडीला उत्तमरावांचे सारे कुटूंबच या लढ्यात उतरले. वैयक्तिक सत्याग्रहाच्या चळवळीत लिलाताईंनी दिनांक १६ फेब्रुवारी १९४१ रोजी महालखेडे येथे युद्ध विरोधी भाषण व सत्याग्रह केला परिणामी लिलाताईंना पहिल्यांदा तुरुंगावास घडला. या समयी डॉ. उत्तमराव युद्धविरोधी भाषणामुळे तुरुंगात होते. अशा परिस्थितीत सर्व कुटूंबाचा भार अंगावर असतांना, पती तुरुंगात असतांना युद्धविरोधी भाषण

करून लोकांना जागृत करण्याचे काम एका स्त्रीने केले. एवढेच नव्हे तर १५ ऑगस्ट १९४२ ला अमळनेरात घडलेले मुंबई प्रांतातले सर्वात मोठे तर खानदेशातले पहिले क्रांतीपर्व अमळनेर जळीत कांडच्या रुपाने पुरुषांपेक्षा स्त्रिया एक कडी वर असतात हे सिद्ध केले. दुसऱ्या दिवशी मार्शल लॉ चा भंग केला म्हणून लीलाताईंना अटक झाली. त्यांना साडेसात वर्षाची शिक्षा झाली. त्यांना येवरडा कारागृहात ठेवण्यात आले. तेथुन त्या पळुन गेल्या व प्रतिसरकारात दाखल झाल्या. हे येरवड्यातुन जेल पलायन खूप गाजले. त्यावर लीलाताईंनी पक्षी पिंजऱ्यातून उडाला अशा आशयाचा लेखवजा दीर्घ निबंधही लिहिला.

## लीलाताई पाटील यांचे शैक्षणिक कार्य

अर्थार्जनाचे एकमेव साधन डॉक्टरकी व्यवसाय असतांनाही डॉ. उत्तमराव व १९४८ ते १९५२ पर्यंत लीलाताईंनी स्वतःचा वैद्यकिय शिक्षणाच्या ज्ञानाचा उपयोग स्वातंत्र्य चळवळीतील सहभागासाठी केला. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी आपले शैक्षणिक कार्य आदिवासी बहुल शिरपूर तालुक्यात सुरु केले.

## वनिता सेवा मंडळाची स्थापना

स्वातंत्र्योत्तर शैक्षणिक कार्य म्हणून या संस्थेकडे पाहता येईल. या संस्थेची स्थापना लीलाताई पाटील यांनी धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथे केली (१९६२). या मंडळाचे उद्देश्य व कार्यक्रमांवर नजर घातली असता त्यात लीलाताईच्या स्त्रीविषयक दूरदृष्टीकोनाचे च स्वावलंबनाचे प्रतिबिंब दिसते. वनिता सेवा मंडळ प्रथमच प्राधान्याने उत्कर्षासाठी महिलांनी चालवलेल मंडळ होते. त्या मंडळात जरी महिलंचा समावेश असला तरी मात्र महिलांसोबतचा अविभाज्य गट लहान मुलांचाही सखोल विचार त्यांनी केलेला आहे. महिला व बालकांचा सामाजिक व सांस्कृतिक विकास करण्यासाठी रचनात्मक कार्याचा विकास व संघटन करणे असे दूरगामी उद्दिदष्ट बनिता सेवा मंडळाचे होते. समाजातील. स्त्रीचे दुय्यम स्थान व दर्जा उंचावण्यासाठी त्यांना स्वावलंबी व आत्मनिर्भर करण्यासाठी कृती कार्यक्रमच त्यांनी नजरेसमोर ठेवला होता. स्त्री व बालकांच्या शिक्षणाचा विस्तार करणे, गृहउद्योगांची उभारणी करून मध्यम वर्गीय महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे व त्यातून उत्पादीत वस्तुंची विक्री करणे, निराधार महिलांना मदत व तरुण-तरुणी व महिलांना आरोग्य व इतर बाबत सल्ला व प्रबोधीत करणे अशा प्रकारांच्या कार्यक्रम त्यांना अपेक्षित होता.

आज महाराष्ट्र शासनाने सुरु केलेली बचत गटाची योजना की ज्या मार्फत महिलांना गृहउद्योग व कुटीरोद्योग उभारुन, त्यांच्या उत्पादित वस्तुंची विपणन व्यवस्था चालवली जात आहे. त्याचे मुळ या वनिता सेवा मंडळाच्या कृती कार्यक्रमात आढळुन येते. स्त्रियांच्या व बालकांच्या (विशेषतः मध्यमवर्गीयांच्या) जागृतीसाठी व्याख्याने, सिनेमा इ. साधनांचा वापर करून त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करणे व त्याचा सामाजिक व सांस्कृतिक स्तर उंचावणे हा कृती कार्यक्रम विशेष वाखाणण्यासारखा आहे.

## शिरपूर येथे पहिली मुलींची शाळा सुरु केली

क्रांतीविरांगना लीलाताई पाटील यांनी शिरपूर पश्चिम खानदेश येथे पहिली मुलींची शाळा वनिता सेवा मंडळाच्या अंतर्गत इ.स. १९६३ मध्ये सुरु केली. शिरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील व शहरी भागातील मुलींना इयत्ता ८ वी नंतर शिकवत नसत. कारण हायस्कुलांची अनुपलब्धता होती. म्हणून सर्वप्रथम शिरपूरात कन्या विद्यालयाच्या रुपाने लिलाताईंनी स्त्री शिक्षणाचा पाया घातला. शिवाय इतरही कार्यक्रम लीलाताईंनी बनिता सेवा मंडळामार्फत चालवले. डॉ. उत्तमराव पाटील यांनी क्रांतीपर्वात लीलाताईंच्या शैक्षणिक कार्याबद्दल लिहितात, शिरपूरला बनिता सेवा मंडळ स्थापून बालवाडी शिवणकामवर्ग आदि चालवले व कन्या विद्यामंदिर पहिले मुलींचे माध्यमिक विद्यालय स्थापून ८ वी ते ११ वी पर्यंतचे वर्ग लीलाताईंनी चालविले.

## क्रांतीवीरांगना लीलाताई पाटील यांचे सामाजिक कार्य

लिलाताईंचे सामाजिक क्षेत्रातील कार्य मोलाचे आहे. त्यांचे सामाजिक कार्य हे पश्चिम खानदेशच्या इतिहासात भर टाकणारे आहे. त्यांनी आपल्या सामाजिक कार्यातुन समाजात प्रबोधनाचे कार्य केले आहे.

## शिरपूर येथे स्त्री होमगार्ड दल सुरु केले

तरुण स्त्री, पतीच्या खांद्यास खांदा लावून कार्यरत राहणारी बंडखोर, स्वातंत्र्यसेनानी, क्रांतीविरांगना, रुग्णसेविका, बोर्डींगमधल्या मुलांची मायेची पाखर घालणारी माय राजकारण धुरंदर, समाजसेविका गृहिणी इ. महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडणाऱ्या लीलाताईंनी आयुष्यातल्या अगदी उत्तरोत्तर ही स्वस्थ न राहता नव्याच क्षेत्रात पदार्पण केले. ते म्हणजे 'स्त्री होमगार्ड दल' १९७८ मध्ये त्या होमगार्ड दलात सामील झाल्या. शिरपूर येथे होमगार्ड दलाची बांधणी उभारणी ताईंनी केली. लीलाताई एक महिला असल्याने शिरपूरच्या होमगार्ड दलात महिलांची संख्या वाढली व तेथे स्वतंत्र तुकडी निर्माण झाली. महिला पथकाच्या प्रमुख पदावर लीलाताई शेवटपर्यंत कार्यरत राहिल्या होत्या. त्यांच्या आकस्मिक निधनानंतर होमगार्ड दलाचे धुळे जिल्हा समादेशक प्रा. साहेबराव पाटील आपल्या शोकसंदेश पत्रात लिहितात की, कै. लिलाताई थोर स्वातंत्र्यसैनिक होत्या व धुळे जिल्हा होमगार्डस संस्था, शिरपूर पथकाच्या महिला प्रमुख या नात्याने चांगले सहकारी व उत्तम संघटक होत्या. होमगार्डस संस्थेला त्यांची मोलाची सेवा मिळाली आहे. या पुढे त्यांच्यासारख्या चांगल्या कार्यकर्त्या मिळणे कठिणच. सन १९७८ ते १९८५ अशी ७-८ वर्ष सेवा त्यांनी होमगार्ड दलात बजावल्याचे दिसते. प्रतिसरकारचे सेनानी या नात्याने अनुभवी असल् कामात त्यांना जास्त स्वारस्य होते.

## लीलाताई पाटील यांनी केले हरिजन उद्धार कार्य

लिलाताई ज्या सामाजिक परिवेशातून घडल्या त्या सत्यशोधक समा परंपरेत जाती, उच्चनीचता भेदाभेद, श्रेष्ठ, कनिष्ठता अमान्य असल्याने शुद्रपा स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचे अधिकार दिल्या त्यास अनुसरुन त्यांनीही त्यांच्या संपूर्ण जीवनात त्याचा सातत्याने पुरस्कार केला. १९४० साली लीलाताई पाटील, डॉ. उत्तमराव पाटील यांनी पश्चिम खानदेशात व पूर्व खानदेशात हरिजन विद्यार्थ्यांसाठी बोर्डींग काढले. शेतकरी बोर्डींगला जोडून हरिजन बोर्डींग काइत असाल तर पैसे देईन अशी अट घालणाऱ्या साने गुरुजींना प्रतिसाद देत लिलाताई व उत्तमरावांनी शेतकरी बोर्डींगला जोडून हरजिन बोर्डींगही काढले होते. त्या संदर्भात डॉ. उत्तमराव पाटील क्रांतीपर्वात नमुद करतात की, गुरुजींनी दहा हजार रुपयाचं देणगी लीलाताईंना हरिजन बोर्डींग काढण्यासाठी दिली. एकमेव लीला देखरेख तिची १९४७ साली क्रांतीविरांगना लीलाताईंनी शेतकऱ्यांच्याच मुलांना नव्हे तर हरिजनांच्या मुलांनाही वस्तीगृहातील 'माय' मिळाली. बोर्डींगला लागणाऱ्या खर्चातील साने गुरुजींनी दिलेल्या १०,०००/- रुपयांचे त्यांनी व्यवस्थीतपणे व्यवस्थापन व नियोजन केले होते. अशा तन्हेने हरिजनोद्धाराचे कार्य लीलाताई पाटील यांनी केले.

## क्रांतीविरांगना लीलाताई यांचे राजकीय कार्य

लिलाताईंच्या राजकीय कार्याची सुरुवात शिरपूर शहर नगरपरिषदेच्या निवडणुकीपासून होते. १९५७ ते १९६२ या काळात लीलाताई या शिरपूर नगर परिषदेच्या सदस्या म्हणून निवडून आल्या होत्या. १९७२ च्या महाराष्ट्र विधीमंडळाच्या निवडणुकीत लीलाताई या शिंदखेडा मतदार संघातुन आमदार म्हणुन निवडुन आल्या.

## शिंदखेडा विधानसभा मतदार संघातील राजकीय विकास कार्य

लीलाताई पाटील यांनी आमदार असतांना शिंदखेडा मतदारसंघाचा अवर्षणग्रस्त व कोरडवाहू शेतीचा प्रश्न सोडविला. तापी नदीवर 'लिफ्ट इरिगेशन'द्वारे शेती जलसिंचनाच्या योजना राबविल्या. अमळथे, नेवाडे, टाकरखेडे येथे जलसिंचनाच्या योजना उभारल्या. तर म्हळसर गावाच्या जलसिंचन योजनेला विधीमंडळाची मंजुरी मिळवून दिली. तापी नदी हे शिंदखेडा मतदार संघाला वरदान आहे. तापी नदीच्या पाण्याचा उपयोग तालुक्यासाठी (मतदार संघासाठी) करावा. यासंबंधी आपले मत मांडतांना लिलाताई म्हणतात, शिंदखेडा तालुका मतदार संघाची दुर्दशा संपवायची असेल तर तापी हे वरदान आहे. तापीकाठच्या प्रत्येक खेड्यावर म्हळसरपासून ते टाकरखेड्यापर्यंत कमखेडे, दभाशी, सुकवद, अकडसे, नेवाडे, अमळथे, हिसपूर, रंजाने, कोड्दे आदि गावांना जिथे शक्य असेल तेथे लिफ्ट योजनांची रांग लागली तर १५ ते २० हजार एकर जमिन बारमाही पाण्याखाली येईल म्हणून त्या दिशेने प्रयत्न जारी केले. दभाशीला सर्वात मोठी लिफ्ट योजना व गाव विहीरीवर इलेक्ट्रीक मोटारीसाठी विद्युतीकरण इत्यादी काम पूर्ण केले. या तालुक्यातल्या लिफ्ट इरिगेशनच्या स्वांनुभवावरुन लिलाताईंनी त्यातील त्रुटी, कार्यवाही दिरंगाई व इतर कारणांचा शोध घेऊन शासनाच्या निदर्शनास आणले आणि संपूर्ण महाराष्ट्रात महाराष्ट्र

लिफ्ट कॉर्पोरेशनच्या निर्मितीचे स्वप्न पाहिले. धरण विरहीत शिंदखेडा तालुक्यात वासदरा येथे १ कोटी २६ लाखांचे धरण वालखेड्याला जॅकवेल इत्यादी कामे शासनाकडून ताईंनी सातत्याने व चिकाटीने पाठपुरावा करून मंजूर करवून घेतली.

याशिवाय 'धडक योजनेत' ५०० पंप विहीरीवर बसवले. नरडाणे, शिंदखेडा, मार्केट शाखांना खरेदीची परवानगी शिंदखेडा, दोंडाईचा येथे एस.टी. डेपोची मंजुरी आणून उभारणी केली. शिंदखेडा सुकवद रस्त्याचे डांबरीकरण केले. बेटावद येथे पांझरा नदीवर पुल बांधला. तालुका काँग्रेस भवन, साखर कारखाना, हातनूर डावा कालवा इ. मोठी स्वप्ने ठेवत त्यांनी मतदारसंघाच्या विकासाचा आराखडा तयार केला होता. डॉ. उत्तमराव पाटील त्यांच्या कार्याचे मुल्यमापन त्यांच्या परिचयाचा आलेख मांडतांना लिहितात. १९७२ ते १९७८ शिंदखेडा तालुक्यातून आमदार असतांना लिलाने गरीबांसाठी गृहनिर्माण योजना, शेतकऱ्यांसाठी पाझर तलाव, कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम शिंदखेडा तालुकाभर राबविला.

## महिलांच्या आरोग्याबाबत आवाज उठविला

आपल्या आमदारकीच्या काळात महिलांच्या आरोगयाचे प्रश्न व लिंग समानता याबाबत ताईंनी कायदेमंडळात आवाज उठविला. त्यावेळी महाराष्ट्राच्या सत्तेवर काँग्रेस पक्ष सत्तेत होता. स्वपक्षाचे सरकार असुनही अर्थसंकल्पावर सर्व साधारण चर्चा व भाषण करतांना लीलाताईंनी सरकारचे कान टोचले. तत्कालीन महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता. महाराष्ट्रात अनेक दुष्काळी कामांची सुरुवात झालेली होती. पोटासाठी सामान्य स्त्रियांना दुष्काळी कामावर जावे लागे. अशा समयी गर्भवती महिलांच्या आरोग्याच्या संदर्भात व महिलांना पुरुषांच्या तुलनेत कमी मिळणाऱ्या मजुरीवर त्यांनी तीव्र आक्षेप घेतला. नुसतीच नापसंती न मांडता त्यांनी तीव्र आक्षेप घेतला. नापसंती न मांडता त्यांनी उपाय योजनाही सुचवल्या विधानसभेतील ५ मार्च १९७३ च्या अर्थ संकल्पावर चर्चेतील भाषणात लीलाताई स्वपक्ष सरकारला सुनावतात की, अध्यक्ष महाराज, दुष्काळी कामावर जाणाऱ्या स्त्रिया कित्येक वेळेला गरोदर असतात. घरी राहुन पोट भरत नाही म्हणून त्या दुष्काळी कामावर जातात. त्यांचे आरोग्य चांगले राहत नाही. बाळंतीण झाल्यावर तर त्या फार अशक्त होतात. मुलांचे योग्य प्रकारे संगोपन करु शकत नाहीत. तेव्हा अशा स्त्रियांसाठी ठिक ठिकाणी दवाखाने सुरु करायला पाहिजेत. गुजरात राज्यामध्ये पुरुष असो की खी असो दोघांनाही दोन रुपये तीस पैसे मजुरी दिली जाते. अशीच समप्रमाणात मजुरी या राज्यामध्ये का देण्यात येऊ नये? खी आणि पुरुष अशा प्रकारचा भेदभाव न ठेवता पुरुषांना आणि स्त्रियांना समान मजुरी देण्यात आली पाहिजे. आज महागाई वाढली आहे. तेव्हा त्यांना मजुरी वाढवून ती तीन रुपयांपर्यंत दिली पाहिजे.

अशा या थोर क्रांती विरांगनेचा मृत्यु १ मे १९८५ रोजी झाला.

## संदर्भ :-


1) पाटील लीलाताई, तू तर डांगरी गावची लक्ष्मी, लेख, साप्ता. भारतक्रांती ऑगस्ट 1968, शिरपूर, पृ.1.
2) देशमुख हेमंत (संपा.) क्रांतिवीरांगना लीलाताई पाटील, स्मृती गौरव विशेषांक, दोंडाईचा, धुळे दि. 15 ऑगस्ट 1985, पृ.4.
3) पाटील डॉ. विलास वसंतराव, क्रांतिवीरांगना लीलाताई पाटील, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव प्रथम आवृती, मे 2016 पृ.24.
4) पाटील प्रा. साहेबराव, जिल्हा समादेशक, होमगार्डस संस्था, धुळे यांचे पत्र, दि.8/6/1985
5) पाटील लिलाताई, माझ्या आमदारकीचे आमदारकीचे पहिले वर्ष म्हणजेच पहिले पाऊल, लेख, साप्ताहिक भारत, भारत क्रांती, शिरपूर, 1973, पृ.21
6) मुलाखत, पाटील शिवाजीराव गिरिधर, माजी आमदार व मंत्री, महाराष्ट्र राज्य, दि.2/2/2015, स्थळ-शिरपूर.
7) शहा डॉ. जी. बी., शहा प्रा. सौ. त्रिशला गजकुमार, उपरोक्त क्र.48, पृ.121.
8) वाणी हरिभाऊ (संपा.), अक्षरयात्री श्री. दादासाहेब शिवाजीराव पाटील गौरवग्रंथ, समाविष्ट प्रधान ग.प., समाजवादी चळवळीतील माझे साथीदार शिवाजीराव पाटील, शिवाजीराव गौरव ग्रंथ समिती, शिरपूर,1992. पृ.7
9) वाणी हरिभाऊ (संपा.) अक्षरयात्री दादासाहेब शिवाजीराव पाटील गौरवग्रंथ, समाविष्ट पाटील भास्कर पुंडलिक, कृषि क्रांतीचे जनक शिवाजीराव पाटील, शिवाजीराव गौरव ग्रंथ समिती, शिरपुर, 1992, पृ.68

10) पांडे डॉ. मधुकर, धुळे जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा, प्रकाश ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, 1992, पृ.78

11) बापट गोविंद महादेव, धुळे जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव ग्रंथ, भारत टाईपरायटिंग इन्सिटट्युट, धुळे 23 फेब्रुवारी 1988, पृ.1